## वेबसाईटला दयावयाचे

## सनदी लेखापरिक्षण जाहिरात नमुना

जिल्हा परिषद, उस्मानाबाद अंतर्गत स्वच्छ भारत मिशन ग्रामीण व जागतिक बँक प्रोस्ताहन अनुदान या योजनेचे जिल्हास्तर व सर्व तालुकास्तर यांचे सन २०२१-२२ या आर्थीक वर्षाचे नियत्रक व महालेखापरिक्षक (CAG) यांनी निवड केलेल्या सनदी लेखापाल संस्थेच्या निवड सूचीमधून पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक जस्वप्र.-०२/प्र.क्र.६३/पापु-११ दि.१९ जुन २०१७ मधील परिशिष्ट Annexure १ अन्वये पात्र (Empanelled) सनदी लेखापाल यांचे कडून उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनेनुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) या योजनेचे परिशिष्ट Annexure ३ प्रमाणे लेखा परिक्षण करावयाचे आहे. तरी लेखा परिक्षकांनी आपली माहिती **दि.३०ऑगस्ट २०२२** सायकाळी ५ वाजेपर्यत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांचे कडे सीलबंद लिफाफ्यामध्ये सादर करावी.

**अटी व शर्ती**

१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक जस्वप्र.-०२/प्र.क्र.६३/पापु-११ दि.१९ जुन २०१७ मध्ये देण्यात आलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करून विहीत नमुन्यात लेखापरिक्षण अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

२. तालुकास्तरावरील लेखापरिक्षण हे संबधित तालुक्याच्या ठिकाणीच करावे.

३. लेखापरिक्षण शुल्क शासन निर्णय क्रमांक जस्वप्र.-०२/प्र.क्र.६३/पापु-११ दि.१९ जुन २०१७अन्वये अनुदेय आहे. तसेच लेखापरिक्षण शुल्क अग्रीम स्वरूपात वितरीत करण्यात येणार नाही.

४. लेखापरिक्षण हे आपणास आदेश दिल्यापासून १० दिवसाच्या आत पुर्ण करून लेखापरिक्षण अहवाल दोन प्रतिमध्ये या कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे.

५. लेखापरिक्षण शुल्क लेखापरिक्षण पुर्ण करून सनदी लेखापरिक्षण अहवालासह देयक दोन प्रतिमध्ये सादर केलेनंतर अदा करण्यात येईल.

६. लेखापरिक्षणाचे आदेश कोणत्याही वेळी रद्द करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीतांकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

७. कोणत्याही तक्रारीसाठी न्यायालयीन क्षेत्र उस्मानाबाद राहील.

उपरोक्त अटी व शर्तीच्या अधीन राहून सनदी लेखापरिक्षक यांनी तांत्रिक कोटेशन **SWACHHA BHARAT MISSION GRAMIN ZILHA PARISHAD OSMANABAD** यांचे नावे **रू.1,000/- DD सह** जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद, उस्मानाबाद येथे सादर करावेत.

**Dy.Ceo (WS&S)**
Zilla Parishad,Osmanabad

**Chief Executive Officer**
Zilla Parishad,Osmanabad